# राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) अधिनियम, १९९४

**सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२**

राज्य निवडणूक आयुक्ताच्या नियुक्तीच्या अर्हता व त्याची नियुक्ती यांसाठी आणि त्याच्याशी संबंधित आनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयुक्ताच्या नियुक्तीच्या अर्हता व त्याची नियुक्ती यांसाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा आनुषांगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; ज्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचेचाळीसाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहेः

**१. या अधिनियमास, राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) अधिनियम, १९९४ असे म्हणावे.**

**२. व्याख्या**

या अधिनियमात-

(१) “शासन” म्हणजे महाराष्ट्र शासन;

(२) “राज्य निवडणूक आयुक्त” म्हणजे भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४३-ट अन्वये नियुक्त करण्यात आलेला राज्य निवडणूक आयुक्त.

**३. नियुक्तीच्या अर्हता -**

राज्य निवडणूक आयुक्ताची नियुक्ती, शासनाच्या प्रधान सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल असे पद ज्या व्यक्ती धारण करीत असतील किंवा ज्यांनी धारण केलेले असेल अशा व्यक्तींमधून करण्यात येईल.

**४. वेतन -**

राज्य निवडणूक आयुक्ताला दरमहा रुपये ७,६०० इतके वेतन देण्यात येईल.

परंतु, जी व्यक्ती तिची राज्य निवडणूक आयुक्ताच्या पदावर नियुक्ती होतेवेळी भारत सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली प्रधान सचिवापेक्षा वरच्या दर्जाचे पद धारण करत असेल आणि तिला दरमहा रु७,६०० पेक्षा अधिक वेतन असेल किंवा होते तर त्या व्यक्तीच्या, राज्य निवडणूक आयुक्त म्हणून तिची अशी नियुक्ती होतेवेळीच्या वेतनाचे संरक्षण केले जाईल.

आणखी असे की, ज्या व्यक्तीला, राज्य निवडणूक आयुक्त म्हणून पदग्रहण करण्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वी संघराज्य शासनाच्या नियंत्रणाखालील किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही अगोदरच्या सेवेच्या संबंधात (विकलांगता किंवा इजा निवृत्तिवेतन या व्यतिरिक्त अन्य) निवृत्तिवेतन मिळत होते किंवा असे निवृत्तिवेतन घेण्याची निवड करण्यास पात्र असल्याने, जिने असे निवृत्तिवेतन घेण्याची निवड केली होती. त्या व्यक्तीच्या राज्य निवडणूक आयुक्त म्हणून असलेल्या सेवेच्या संबंधातील वेतनातून अशा निवृत्तिवेतनाची रक्कम कमी करण्यात येईल.

**५. राज्य निवडणूक आयुक्ताने अन्य पद धारण न करणे-**

राज्य निवडणूक आयुक्त, संसदेच्या सदस्य किंवा राज्य विधानमंडळाचा सदस्य किंवा राज्यातील कोणत्याही पंचायतीचा किंवा नगरपालिकेचा सदस्य नसेल आणि तो (राज्य निवडाूक आयुक्त म्हणून असलेल्या त्याच्या पदाव्यतिरिक्त अन्य) कोणतेही विश्वासापेक्षी पद किंवा लाभाचे पद धारण करणार नाही किंवा तो कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असणार नाही किंवा कोणताही धंदा किंवा व्यवसाय करणार नाही आणि त्यानुसार राज्य निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, आपले पद ग्रहण करण्यापूर्वी,-

(अ) जर ती संसदेची किंवा राज्याच्या विधानमंडळाची किंवा पंचायतीची अथवा नगरपालिकेची सदस्य असेल तर अशा सदस्यत्वाचा राजीनामा देईल किंवा.

(ब) जर ती कोणतेही विश्वासपेक्षी पद किंवा लाभाचे पद धारण करीत असेल तर अशा पदाचा राजीनामा देईल किंवा

(क) जर ती कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित असेल तर त्यांच्याशी असलेले संबंध तोडून टाकील किंवा

(ड) जर ती कोणताही धंदा करीत असेल तर (आपली मालकी सोडून देण्यापर्यंत न जाता) अशा धंद्याच्या संचालनासाठी व व्यवस्थापनाशी असलेले तिचे संबंध तोडून टाकील; किंवा

(ई) जर ती कोणताही व्यवसाय करीत असेल तर असा व्यवसाय करण्याचे थांबवील.

**६. पदावधी-**

(१) राज्य निवडणूक आयुक्त ज्या दिनांकासा तो आपले पदग्रहण करीत त्या दिनांकापासून पाच वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी पद धारण करील; आणि तो पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही.

परंतु राज्य निवडणूक आयुक्त, आपल्या सहीनिशी राज्यपालास उद्देशून पत्र लिहून आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकेल.

(२) राज्य निवडणूक आयुक्तास भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-ट च्या खंड (२) च्या परंतुकामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रितीने असेल त्याव्यतिरिक्त अन्य प्रकारे पदावरुन दूर करण्यात येणार नाही.

**७. रजा-**

(१) राज्य निवडणूक आयुक्ताला एका कॅलेंडर वर्षामध्ये ३० दिवसांची अर्जित रजा मिळण्याचा हक्क असेल आणि ती रजा प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या १ जानेवारी व १ जुलै रोजी प्रत्येकी १५ दिवसांच्या दोन हप्त्यांमध्ये त्याच्या रजेच्या खात्यावर आगाऊ जमा करण्यात येईल.

(२) (अ) राज्य निवडणूक आयुक्ताला, सेवेच्या प्रत्येक पूर्ण झालेल्या वर्षाच्या सबंधात वीस दिवस या दराने, वैद्यकीय प्रमाणपत्रे सादर करुन किंवा खाजगी कामांसाठी अर्धपगारी रजा मिळण्याचा हक्क असेल आणि अर्धपगारी रजेचे रजावेतन हे अर्जित रजेच्या वेळी अनुज्ञेय असलेल्या रजावेतनाच्या निम्म्याइतके असेल.

(ब) राज्य निवडणूक आयुक्ताच्या स्वेच्छानिर्णयानुसार अर्धपगारी रजेचे पूर्णपगारी रजेमध्ये परिवर्तन करता येईल, मात्र ती रजा वैदयकीय प्राधिका-याने दिलेले वैदयकीय प्रमाणात असले पाहिजे.

(३) राज्य निवडणूक आयुक्ताला, एका पदवीमध्ये, जास्तीत जास्त एकशेएंशी दिवसांच्या कालावधीची, पगार व भत्ता न मिळणारी असाधारण रजा मिळण्याचा हक्क असेल.

(४) राज्य निवडणूक आयुक्ताला त्याच्या पदावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या खात्यावर शिल्लक असलेल्या अर्जित रजेच्या संबंधातील रजा वेतनाईतकी रोख रक्कम मिळण्याचा हक्क असेल.

(५) राज्य निवडणूक आयुक्ताला, पोट कलम (४) अन्वयेच्या रजावेतनावर अनुज्ञेय म्हणून, त्याने राज्य निवडणूक आयोगाचे पद सोडून दिल्याचा दिनांकाला अनुज्ञेय असलेल्या दरानुसार महागाई भत्ता मिळण्याचा हक्क असेल,

परंतु, त्याला अशा रजावेतनावर शहर पूरक भत्ता किंवा इतर कोणताही भत्ता मिळण्याचा हक्क असणार नाही.

(६) राज्य निवडणूक आयुक्तास रजा देण्याचा किंवा नाकारण्याचा आणि त्यास दिलेली रजा रद्द किंवा कमी करण्याचा अधिकार राज्यपालांकडे निहित असेल.

**८. राज्य निवडणूक आयुक्तास देय असलेले निवृत्तीवेतन -----**

(१) जी व्यक्ती राज्य निवडणूक आयुक्त म्हणून पद ग्रहण करण्याचा दिनांकाच्या लगतपूर्वी भारत सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या सेवेत होती ती व्यक्ती, ज्या दिनांकास ती राज्य निवडणूक आयुक्त म्हणून पद ग्रहण करील त्या दिनांकास सेवेतून निवृत्त झाल्याचे समजण्यात येईल. परंतु, राज्य निवडणूक आयुक्त म्हणून असलेल्या त्यानंतरच्या तिच्या सेवेची गणना ती ज्या सेवेतील निवृत्तीवेतनासाठी हिशेबात धरली जाणारी निरंतर मान्य सेवा म्हणून गणली जाईल.

(२) ज्या बाबतीत राज्य निवडणूक आयुक्त पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात असलेल्या कोणत्याही रीतीने किंवा राजीनामा देउन पद सोडून देईल त्या बाबतीस त्यास अशाप्रकारे पद सोडून दिल्यावर, त्यास इतर कोणतेही निवृत्तीवेतन मिळत असेल तर त्याशिवाय, सेवेच्या प्रत्येक पूर्ण केलेल्या वर्षासाठी किंवा त्याच्या भागासाठी दरवर्षी सातशे रुपये या दराने निवृत्तीवेतन देण्यात येईल आणि आयोगातील सेवेच्या वर्षाची संख्या कितीही असली तरी निवृत्तीवेतनाची जास्तीत जास्त रक्कम दरवर्षी तीन हजार पाचशे रुपयांपेक्षा असणार नाही,

परंतु राज्य निवडणूक आयुक्ताची राज्य निवडणूकआयोगाकडे दोन वर्षांपेक्षा कमी सेवा झालेली असेल तर त्याला असे कोणतेही निवृत्तीवेतन देय असणार नाही.

(३) राज्य निवडणूक आयुक्त  राजीनामा देउन पद सोडून देईल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत ---

(अ) त्या कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या पदावधी पुर्ण केलेला असेल, किंवा

(ब) पद सोडून देण्याची त्याची कृती अनारोग्यामुळे आवश्यक झाली असल्याचे वैद्यकीयरीत्या प्रमाणित करण्यात आलेले असेल,

तरच केवळ, त्याने या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आपले पद सोडून दिले असल्याचे मानण्यात येईल.

**९. सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीत वर्गणी देण्याचा हक्क -----**

राज्य निवडणूक आयुक्ताला त्याच्या विकल्पानुसार, सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीत वर्गणी देण्याचा हक्क असेल आणि तो असा विकल्प निवडील त्या बाबतीत, महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियमांच्या तरतुदींद्वारे त्याचे नियमन केले जाईल.

परंतु, राज्य निवडणूक आयूक्ताने राज्य निवडणूक आयक्त म्हणून पद ग्रहण केल्याचा दिनांकाच्या लगतपूर्वी तो अखिल भारतीय सेवेतील सदस्य असेल किंवा त्याने केंद्र सरकारच्या अथवा एखादया राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील पद ग्रहण केल्याचा दिनांकाच्या लगतपूर्वी त्याला लागू असलेल्या नियमांद्वारे त्याचे नियमन केले जाईल.

**१०. सेवेच्या इतर शर्ती ----**

या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आलेली असेल त्या व्यतिरीक्त, संबध्द नियमानुसार महाराष्ट प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या सदस्यांच्या बाबतीत त्या त्या वेळी लागू असलेल्या, महागाई भत्ता (निवृत्तीवेतनावरील धरुन), स्थानिक पूरक भत्ता आणि प्रवास भत्त्यासह इतर सर्व भत्ते, भाडे माफ निवासस्थानासाठी तरतूद, वाहन सुविधा, वैदयकीय सोयी यांच्या संबंधातील सेवाशर्ती आणि अशा इतर सेवाशर्ती शक्य असेल तेथवर, राज्य निवडणूक आयुक्ताच्या बाबतीत लागू होतील.